**संदर्भ :** १) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र. ग्रापाधो-१११४/ प्र.क्र.५२/पापु-०७, दि.१७/१०/२०१४.
२) का.अ. ग्रा.पा.पु. विभाग, जि.प. नाशिक यांचे तांत्रिक मंजुरीचे पत्र क्र. जिपना/ग्रापापुवि/ तांमा/रेशा-३/८९१, दि.१२/०६/२०१७.
३) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे प्रशासकीय मान्यता आदेश क्र. जिपना/ग्रापापुवि/प्र.मा.-(३ दे.दु.)/रेशा/१०५४, दि.१२/०७/२०१७.
४) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचा शासन निर्णय क्र. झेडपी-२०१६/प्र.क्र.५६/वित्त-०९, दि.०७ ऑक्टोंबर, २०१७.
५) जिल्हा परिषद, नाशिक जलव्यवस्थापन समिती सभा दि.०६/०५/२०१७ च्या बैठकीची मंजुर ठराव.

---

## कार्यारंभ आदेश

जा.क्र.जिपना/ग्रापापुवि/निविदा/ ९३ /२०१८
दिनांक : 11/01/18
11 JAN 2018

प्रति,
**श्री विनय अशोक कुवर,**
शाम प्राईड, प्रमोद महाजन गार्डन शेजारी,
मुंबई आग्रा रोड, पंचवटी, नाशिक

खालील दर्शविलेले कामाची निविदा आपल्या नावे, **मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक** यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा **(-०.३%)** कमी दराने खालील नमुद अटि व शर्ती नुसार मजुर करण्यात येत आहे. त्यानुसार सदर कामाबाबत आपण सदरचे काम करण्याबाबत करारनामा करुन दिलेला आहे.

त्यानुसार खालील दर्शविलेले काम, मंजुर ब-१ ई-निविदेप्रमाणे सुरु करावे. उपअभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, सुरगाणा यांना सदर कामाची देखरेख करण्याबाबत अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. काम सुरु करण्याची तारिख या आदेशाच्या दिनांकापासून असुन, करारनाम्याप्रमाणे सदरचे काम पुर्ण करण्याची अंतिम मुदत दि.३०/०६/२०१८ पर्यंत आहे. सोबत ब-१ ई-निविदेची प्रत जोडुन पाठवित आहे.

सदरचे काम सुरु असतांना, कामावर हजर राहणा-या जबाबदार व्यक्तीचे नाव या कार्यालयास कळविण्यात यावे. या कामाबाबतचा सर्व पत्रव्यवहार, उपविभागामार्फतच करण्यात यावा. करारनाम्याप्रमाणे शासकीय संचालनाकडे कामागारांचा व कामाचा विमा उतरविणे अनिवार्य आहे. सदर कामाचा सदोष दायित्व कालावधी काम पुर्ण झाल्यानंतर १२ महिने राहील.

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदेची किंमत रुपये | कामाचा दर | स्वीकृत निविदेची किंमत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | **ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल व दुरुस्ती निधी अंतर्गत खुंटेवाडी ता.देवळा येथे आर.सी.सी. सम्प व वितरण व्यवस्था करणे.** | २४,६१,२२३/- | (-) ०.३% कमी दराने | २४,५३,८३९/- | दि.३० जुन, २०१८ पर्यंत |

**लेखाशिर्ष** : जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधी

**प्रशासकीय मंजुरी** : मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे आदेश क्र.जिपना/ग्रापापुवि/प्र.मा.-(३ दे.दु.)/रेशा/१०५४, दि.१२/०७/२०१७.

**तांत्रिक मंजूरी** : मा.कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नाशिक यांचे आदेश क्र.जिपना/ग्रापापुवि/तांमा/रेशा-३/८९१, दि.१२/०६/२०१७.

**अटी व शर्ती :**

१. योजनेच्या उद्भवास पुरेसे पिण्यायोग्य पाणी उपलब्ध असल्याची खात्री करुनच योजनेची पुढील कामे हाती घेण्यात यावीत.

२. सदर कामासाठीची जागा ग्रामपंचायतीच्या मालकीची असल्याबाबत खात्री करावी. तसेच सदरची जागा खाजगी मालकीची असल्यास, त्याबाबत ग्रामपंचायतीच्या नावे दानपत्र केल्याबाबत करारनामा केलेला असल्याची खात्री करुन, सदर जागा ग्रामपंचायतीच्या नावावर करुन काम हाती घेण्यात यावे.

३. विहीत मुदतीत काम पुर्ण न केल्यास, जिल्हा परिषद प्रतिदिनी जो दंड आकारेल, तो आपणास बंधनकारक राहील.

४. सदर कामासाठी आवश्यक असलेलया सर्व विभागाची परवानगी घेतल्याबाबतची खात्री करावी.

५. सदरचे काम पुर्ण झाल्यानंतर, सदरहू काम जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधी योजनेतुन घेण्यात आल्याचा नामफलक कामाच्या ठिकाणी ठळकपणे दिसेल असा लावण्यात यावा.

६. सदर कामासाठी कोणल्याही प्रकारचा अतिरिक्त मोबदला (उदा. भाववाढ इत्यादी) तसेच कोणताही अग्रीम (Advance) जिल्हा परिषदेमार्फत अदा केला जाणार नाही.

७. सदर कामाचे लेखापरिक्षण झाल्यावर, लेखापरिक्षणास काही शक अगर वसुली निघाल्यास, त्याची पुर्तता करण्याची जबाबदारी आपली राहील.

८. संदर्भ क्र.२ व ३ मधील प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यतेच्या आदेशात नमुद अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

९. GST बाबत वेळोवेळी निर्गमित होणारे शासन निर्णय, शासन परिपत्रके, शासन अध्यादेश, शासन पत्रे लागु राहतील.

१०. तसेच योजनेच्या कामाबाबत शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित होणारे शासन निर्णय, शासन परिपत्रके, शासन अध्यादेश, शासन पत्रे लागु राहतील.

११. सदरचे काम पुर्ण झाल्यानंतर, ग्रामपंचायतीस हस्तांतरीत करणे बंधनकारक राहील.

11/01/18

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
जिल्हा परिषद, नाशिक

**प्रत :** उप विमा संचालक, विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण भवन २६४ पहिला मजला कला नगर समोर वांद्रे, पुर्व मुंबई ४०००५१ यांना माहितीसाठी रवाना.

**प्रत :** उप अभियंता, ग्रा.पा.पु. उप विभाग, मालेगांव यांना माहीतीस्तव रवाना.
**सोबत :** ब-१ निविदेची प्रत जोडुन पुढील कार्यवाहीसाठी रवाना.